अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती.

स्वायत्त संस्था

## अनेकांत व्यासपीठ

०७ जुलै २०२२

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतुरचंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

बारामती.

विषय: अनेकांत व्याख्यानमालेतील पहिल्या व्याख्यानाबाबत-

आदरणीय महोदय,

शनिवार दि. ०५/०३/२०२२ रोजी अनेकांत व्यासपीठद्वारा आयोजित अनेकांत व्याख्यानमालेतील पहिले व्याख्यान संपन्न झाले.

सदर व्याख्यानासाठी डॉ. अजित पाटील (सचिव, दक्षिण भारत जैन सभा) हे व्याख्याते म्हणून लाभले होते. त्यांनी 'जागतिक शांततेसाठी अनेकान्तवाद' या विषयावर आपले विचार श्रोत्यांसामोर मांडले.

या व्याख्यानासाठी आपल्या संस्थेचे खजीनदार मा. श्रीमान सुनीलभाई शाह लेंगरेकर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य श्रीमान चंद्रगुप्त शाह वाघोलीकर, श्रीमान डॉ. जे. जे. शाह, श्रीमान सत्यजित पंदारकर हे ही व्याख्यानास उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य आणि अनेकांत व्यासपीठ चे संयोजक मा. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, एम. बी. ए. चे डायरेक्टर मा. डॉ. लाहोरी सर सुद्धा व्यासपीठावर उपस्थित होते.

मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सरांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. त्यात सरांनी अनेकांत व्यासपीठ स्थापन करण्यामागील आपली भूमिका स्पष्ट केली आणि व्यासपीठाद्वारे प्रस्तावित उपक्रमांची माहिती श्रोत्यांना दिली. व्याख्याते मा. डॉ. अजित पाटील सरांनी प्रस्तावित विषयावर आपले विचार श्रोत्यांसामोर व्यक्त केले. या नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्रीमान सुनीलभाई शाह लेंगरेकर यांनी अध्यक्षीय भाषणात आपले विचार व्यक्त केले.

महाविद्यालयातील प्राध्यापक बंधु-भगिनी, शिक्षकेतर बंधु-भगिनी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि परिसरातील काही श्रोते असे मिळून २००-२५० श्रोते व्याख्यानास उपस्थित होते.

व्याख्यान संपल्यानंतर प्रा. संदिप चोरडिया यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र-संचालन प्रा. सौ. स्मिता मंगुडकर आणि सौ. सुषमा संघई यांनी केले. पत्रकारीता विभागाचे मा. प्रा. पंडीत सर आणि त्या विभागातील विद्यार्थी यांनी व्याख्यानाचे **YouTube** वर थेट प्रक्षेपण आणि छायांकन केले. **YouTube** वरील थेट प्रक्षेपणसाठी समितीचे सदस्य आणि संगणक विभागातील प्रा. श्री. राहुल शहा यांची ही मदत झाली. एकूणच समितीतील सर्व सदस्यांनी आपल्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मोलाची मदत केली. स्टोअर विभागाने जिवराज सभागृहातील नियोजन केले होते.

सदर वृत्तान्त आपल्या माहितीसाठी सादर करीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

एस. पी. चोरडीया.

**Photo:**
**https://drive.google.com/file/d/1ZbEYVxcLMB2KjfKK3xbFp_sDDGLPsbR4/view?usp=sharing**